04-05-2025-Dai-01_DH_PAN_01_04_2016-1.qxp 5/3/2025 11:24 PM Page 1



चेंगराचेंगरीला प्रशासनाचा गलथानपणा कारणीभूत असल्याचा आरोप » पान ३ वर


आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com




केकेआर आज राजस्थान रॉयल्सशी भिडणार » पान ४ वर

वेर्णा, रविवार, ४ मे २०२५ । पाने ४ । ₹ ४ | REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 241 | Verna, | facebook.com/dainikherald | Sunday 4 May 2025 | Pages 4 | ₹ 4

# लईराई जत्रेत चेंगराचेंगरी : ६ भाविकांचा मृत्यू

## ७५ जखमी : ८ चिंताजनक, मृतांच्या कुटुंबियांना १० लाखांची मदत जाहीर : जखमींना १ लाख : तीन दिवसांचा सरकारी दुखवटा

■ टीम दैनिक हेराल्ड :

**पणजी, दि. ३ : शिरगाव येथील प्रसिद्ध लईराई देवीच्या जत्रेत शनिवारी पहाटे झालेल्या चेंगराचेंगरीत सहा भाविकांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या चेंगराचेंगरीत ७५ जण जखमी झाले असून ८ जणांची प्रकृती चिंताजनक आहे. जखमींवर डिचोली, साखळी, आझिलो आणि गोमेकॉत उपचार सुरू आहेत. राज्य सरकरकडून मृतांच्या कुटुंबियांना प्रत्येकी १० लाखांची तर जखमींना एक लाखाची मदत घोषित करण्यात आली आहे. मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी घटनास्थळाचा आढावा घेतल्यानंतर महसूल सचिव संदीप जॅकीस यांच्या अध्यक्षतेखाली सत्यशोधन समिति स्थापन केली असून रविवारपर्यंत ही समिति आपला अहवाल मुख्यमंत्र्यांकडे सोपवणार आहे. राज्य सरकारने तीन दिवसांचा दुखवटा जाहीर केला असून या दरम्यान सर्व सरकारी जाहीर कार्यक्रम रद्द करण्यात आले आहेत.**

केवळ गोवाच नाही तर शेजारच्या राज्यातीलही हजारो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या शिरगावच्या लईराई देवीच्या यात्रेला शनिवारी पहाटे दु:खद गालबोट लागले. शेकडो धोंड सहभागी झालेल्या या यात्रेत अचानक चेंगराचेंगरी झाली आणि यात सहा भविकांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये दोन महिलांसह एका १७ वर्षाच्या मुलाचा समावेश आहे. ८ जणांची प्रकृती गंभीर असून त्यांच्यावर गोवा मेडिकल कॉलेज मध्ये अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत . ही दुर्घटना झाल्याचे समजताच मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी शनिवारी सकाळी संबंधीत रुग्णालयांत जाऊन जखमींची विचारपूस केली आणि घटनास्थळाचाही आढावा घेतला. गोव्यातील सर्वात आदरणीय धार्मिक उत्सवापैकी एक असलेल्या या उत्सवादरम्यान अशी विनाशकारी घटना घडणे अत्यंत दुर्दैवी आहे, असे सावंत म्हणाले. आरोग्यमंत्री विश्वजित राणे यांनी देखील या घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त केले आणि आरोग्य विभागाच्या आपत्कालीन प्रतिसाद पथकांना तातडीने तैनात करण्यात आल्याची पुष्टी केली.गंभीर जखमींना वाचवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जात आहेत. सर्व आपत्कालीन वैद्यकीय सेवा पूर्णपणे कार्यरत आहेत, राणे यांनी सांगितले. विरोधी पक्षांनी या दुर्घटनेला राज्य सरकारला जबाबदार धरले असून योग्य नियोजन नसल्यामुळेच हा प्रसंग ओढवला असल्याचा आरोप केला आहे.

**सत्यशोधन समिती स्थापन**

संपूर्ण राज्याला शोकग्रस्त करणाऱ्या या दुर्घटनेची उच्चस्तरीय चौकशी करण्याचा निर्णय सरकारने घेतला असून महसूल सचिव संदीप जॅकीस यांच्या अध्यक्षतेखाली सत्यशोधन समिति नेमण्यात आली आहे. या समितित दक्षिण गोव्याच्या जिल्हाधिकारी एग्ना क्लींटस, पोलिस महानिरीक्षक वर्षा शर्मा, तसेच दक्षिण गोव्याचे पोलिस अधीक्षक टीकम यांचा समावेश आहे. शनिवारी संध्याकाळी या पथकाने घटनास्थळी भेट दिली. संदीप जॅकीस हे आयएएस अधिकारी असून त्यांनी लाखोंची गर्दी असणाऱ्या २०२४-२५ च्या गोव्याच्या ऐतिहासिक सेंट फ्रान्सिस अवशेष प्रदर्शन सोहळ्याच्या संपूर्ण नियोजनाची जबाबदारी अत्यंत कुशलतेने आणि निर्विघ्नपणे निभावली होती.





### दुर्घटनेतील मृतांची नावे

**तनुजा कवठणकर, आदित्य कवठणकर (दोघेही राहणार अवचीतवाडा - थिवी), यशवंत केरकर (माडेल) , प्रतिभा कळंगुटकर (कुंभारजुवे), सागर नंदरगे (पिळगाव) आणि सूर्या मयेकर (साखळी) यांचा या दुर्घटनेत मृत्यू झाला. काकी तनुजा यांचा आदित्य हा पुतण्या होता. १७ वर्षाचा आदित्य यावर्षीच दहावीची परीक्षा उत्तीर्ण होऊन अकरावीत दाखल झाला होता. यावर्षी त्याची ही यात्रा दुसरी यात्रा होती. गेल्या वर्षीही तो या यात्रेला आला होता. काकी - पुतण्याचा या दुर्घटनेत जागीच मृत्यू झाल्यामुळे कवठणकर कुटुंबियांना तीव्र धक्का बसला आहे .**

### अधिकाऱ्यांची तडकाफडकी बदली

**या दुर्घटनेनंतर मुख्यमंत्र्यांनी घटनास्थळी जाऊन स्थानिक व देवस्थानच्या पदाधिकाऱ्यांशी चर्चा केली . तसेच तातडीने उच्च स्तरीय बैठकही घेतली. या बैठकीत चार अधिकाऱ्यांची तडकाफडकी बदली करण्याचा निर्णय घेण्यात आला. यामध्ये उतर गोवा जिल्हाधिकारी स्नेहा गीते, उत्तर गोवा पोलीस अधीक्षक अक्षत कौशल, उत्तर गोवा पोलीस उपअधीक्षक जीवबा दळवी आणि डिचोली पोलिस निरीक्षक दिनेश गडेकर यांची बदली करण्यात आली आहे. उत्तर गोवा पोलिस अधीक्षक पदाचा कार्यभार राहुल गुप्ता यांच्याकडे सोपवण्यात आला आहे.**

### दुर्घटना नेमकी कशी घडली

**या दुर्दैवी दुर्घटनेनंतर लईराई देवस्थान समितीचे अध्यक्ष दीनानाथ गावकर यांनी पत्रकारांना सांगितले की, ही घटना अत्यंत दु:खदायक आहे. काही धोंडगण आणि भाविकांनी दाखवलेल्या बेजबाबदारपणामुळेच हा प्रसंग घडला असल्याचे ते म्हणाले. या यात्रेत होणाऱ्या अग्निदिव्याच्या कार्यक्रमदरम्यान दोन धोंड गटात वाद झाला. आणि त्यातून सुरू झालेल्या धक्काबुक्कीमुळे काही जण बाजूच्या स्टॉलला धडकले . त्यावेळी तिथे असलेल्या वीजेच्या तारांचा स्पर्श होऊन त्यातल्या काही जणांना शॉक लागला आणि त्यामुळे पळापळ होऊन चेंगराचेंगरी झाली असे गावकर यांनी म्हटले आहे. ही यात्रा धोंडांची यात्रा म्हणून प्रसिद्ध असून धोंडांनीच ती निर्विघ्नपणे पार पाडण्याची जबाबदारी निभावली पाहिजे असे गावकर म्हणाले . तर काही प्रत्यक्षदर्शींच्या म्हणण्यानुसार धोंडांच्या मार्गावर उतार होता आणि या उतारावर पोलिसांनी रांगेच्या नियोजनासाठी दोरखंड बांधला होता . सुरूवातीच्या दोन - दोन रांगांमधली माणसे एका रांगेत येताना दोन महिला या दोरखंडाला अडकून पडल्या आणि या महिलांवर एकामागोमाग एक भाविक पडले आणि एकच गोंधळ उडाला. हा रस्ता अरुंद असल्यामुळे रुग्णवाहिका देखील पोहोचण्यास विलंब झाला असे या प्रत्यक्षदर्शीने प्रसारमाध्यमांना सांगितले.**

# मोफत पाणीपुरवठा योजना बंद केल्याबद्दल सरकारवर टीका

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**मडगाव, दि. ३ :** गोवा सरकारने मोफत पाणीपुरवठा योजना अचानकपणे बंद केल्यावर फातोर्डा मतदारसंघाचे आमदार विजय सरदेसाई यांनी तीव्र नाराजी व्यक्त करत या निर्णयावर कठोर शब्दांत टीका केली आहे. हा निर्णय गरीबविरोधी, गोमंतकविरोधी आणि सामान्य नागरिकांच्या गरजांबद्दल असंवेदनशील आहे, अशी टीका सरदेसाई यांनी केली. सरकारच्या या निर्णयामुळे आधीच महागाईच्या ओझ्याखाली दबलेल्या कुटुंबांवर आणखी एक आर्थिक भार येणार असून, ते लोकांच्या आशांवर पाणी फेरत असल्याचा आरोप त्यांनी केला.

१६ हजार लीटर मोफत पाण्याची योजना ही कमी उत्पन्न गटातील कुटुंबांसाठी जीवनरेखा होती. ही योजना मागे घेणे म्हणजे सामाजिक उत्तरदायित्व झुगारण्यासारखे आहे, असे सरदेसाई म्हणाले. ही केवळ योजनेची परतफेड नाही, तर करुणेची परतफेड आहे. गरजूंकडून पाण्यासारखी मूलभूत गरज हिरावून घेऊन सरकारने आपली खरी मानसिकता दाखवली आहे, असे सरदेसाई यांनी म्हटले आहे.

सरदेसाई यांनी सरकारवर कल्याणकारी योजनांना मागे टाकत विशिष्ट हितसंबंधांसाठी निर्णय घेतल्याचा आरोप केला. गोमंतकीयांचे हित दूर सारत, बाहेरील लॉबी आणि व्यावसायिक कार्टेल यांच्या फायद्याचे धोरण सरकार राबवत आहे, असा आरोप त्यांनी केला.

पान २ ▶

# चेंगराचेंगरीत अडकलेल्या मित्राचे वाचवले प्राण

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**फोंडा, दि. ३ :** शिरगावच्या लईराई जत्रेत झालेल्या भीषण चेंगराचेंगरीत सापडून मरणाच्या उंबरठ्यावर पोहोचलेल्या लक्ष्मण शिंदे (२४, रा. म्हाळशे-कुर्टी ) या युवकाचा त्याच्या मित्रांनी शर्थीचे प्रयत्न करत जीव वाचवला. सद्यस्थितीत लक्ष्मणवर फोंडा उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू असून त्याच्या पोटाला दुखापत झाली आहे. त्याला वाचवताना भैरू ढोरे व गंगाराम ढोरे हे दोघेही किरकोळ जखमी झाले आहेत. सुदैवाने त्यांची प्रकृती स्थिर आहे.

भैरू ढोरे यांनी सांगितले की, गेल्या अनेक वर्षांपासून आम्ही चौघे मित्र शिरगाव जत्रेस न चुकता उपस्थित राहतो. यंदा, गर्दीमुळे अचानक रांगेत गोंधळ उडाला आणि आमचा मित्र लक्ष्मण शिंदे याच्यावर सुमारे २५ लोक कोसळले. क्षणार्धात तो चेंगराचेंगरीच्या खाली अडकत गेला. आम्ही जीव तोडून प्रयत्न केले आणि अखेर त्याला बाहेर काढण्यात यश मिळाले. मात्र, लक्ष्मणच्या अगदी खाली अडकलेल्या दुसऱ्या एका व्यक्तीचा घटनास्थळी मृत्यू झाला, अशी माहितीही त्यांनी दिली.

या घटनेनंतर फोंड्याचे आमदार तथा कृषी मंत्री रवी नाईक यांनी उपजिल्हा रुग्णालयाला भेट देऊन जखमी गंगाराम ढोरे यांची विचारपूस केली. रुग्णालय प्रशासनाला त्यांनी सर्व जखमींवर योग्य उपचार करण्याच्या सूचना दिल्या.

दरम्यान, वीज मंत्री सुदिन ढवळीकर यांनी चेंगराचेंगरीत मृत्युमुखी पडलेल्या भाविकांप्रति शोक व्यक्त केला. अशा दुर्दैवी घटना पुन्हा होऊ नयेत यासाठी जत्रा महोत्सवात गर्दीचे शिस्तबद्ध आणि नियोजनबद्ध व्यवस्थापन अत्यावश्यक आहे, असे ते म्हणाले.

फोंड्यातील सामाजिक कार्यकर्ते विराज सप्रे यांनीही या घटनेबाबत आपली प्रतिक्रिया देताना सांगितले की, उत्सवांमध्ये भक्तांची सुरक्षितता ही सर्वोच्च प्राधान्याची बाब आहे. भाविकांनी देखील योग्य शिस्त पाळली पाहिजे. सरकारने अशा धार्मिक कार्यक्रमांत अधिक कार्यक्षम व्यवस्थापन यंत्रणा उभारावी.

साकोर्डा पंचायतीचे पंच सदस्य महादेव शेटकर यांनी जत्रा आयोजनामधील दुर्लक्षाबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली.

पान २ ▶

# पाकिस्तानकडून बॅलिस्टिक क्षेपणास्त्र चाचणीची तयारी

▶ **भारताने व्यक्त केली चिंता**

▶ **पाकिस्तानच्या जहाजांना भारत बंद**

**नवी दिल्ली, दि. ३ :**

भारत-पाकिस्तान दरम्यान तणाव वाढलेल्या पार्श्वभूमीवर पाकिस्तानकडून जमिनीवरून जमिनीवर मारा करणाऱ्या बॅलिस्टिक क्षेपणास्त्रांची चाचणी लवकरच होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. या प्रकरणाशी संबंधित सूत्रांनी शनिवारी ही माहिती दिली.

भारत सरकारच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, अशा अस्थिर परिस्थितीत पाकिस्तानकडून करण्यात येणारी ही क्षेपणास्त्र चाचणी ही उघड चिथावणी असून भारतासोबतच तणाव अधिक चिघळवण्याचा एक हताश प्रयत्न आहे.

२२ एप्रिल रोजी जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर दोन्ही देशांमध्ये तणाव वाढला आहे. या हल्ल्यात २६ नागरिकांचा मृत्यू झाला होता. भारताने या हल्ल्यामागे सीमापारचा संबंध असल्याचे स्पष्ट



केले असून, दोषींना कठोर शिक्षा देण्याचे आश्वासन दिले आहे. अमेरिका, युरोपियन युनियनसह अनेक आंतरराष्ट्रीय शक्तींनी या हल्ल्याचा निषेध करत दोन्ही देशांना तणाव कमी करण्याचे आवाहन केले आहे. पाकिस्तानकडून या आठवड्यात क्षेपणास्त्र चाचणी होण्याची शक्यता असून, ही कारवाई भारताविरुद्धच्या शत्रुत्वाची गंभीर पातळी आहे, असे एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले. ही चिथावणीखोर आणि बेपर्वा कृती आहे, असेही त्यांनी नमूद केले.

सूत्रांच्या माहितीनुसार, पाकिस्तानने अरबी समुद्रात नौदल सराव वाढवले असून नियंत्रण रेषेवरही (एलओसी) युद्धबंदीचे सातत्याने उल्लंघन केले जात आहे. या घडामोडींमुळे भारताची सतर्कता वाढली आहे.

दरम्यान परराष्ट्र व्यापार महासंचालनालयाने म्हणजेच डीजीएफटीने पाकिस्तानसोबतच्या सर्व प्रकारच्या आयातीवर पूर्णपणे बंदी घातली आहे. त्याचवेळी, जहाजबांधणी महासंचालनालयाने एक आदेश जारी केला आहे की पाकिस्तानी जहाजांना भारतीय बंदरांमध्ये प्रवेश दिला जाणार नाही. पहलगाम हल्ल्यानंतर, भारत आणि पाकिस्तानने एकमेकांविरुद्ध अनेक कारवाई केली आहेत, ज्यामध्ये भारताने सिंधू पाणी करार निलंबित करणे समाविष्ट आहे. यानंतर दोन्ही देशांनी एकमेकांसाठी हवाई क्षेत्र देखील बंद केले आहे. शनिवारी, जहाजबांधणी महासंचालनालयाने सांगितले की, हा आदेश व्यापारी जहाजबांधणी कायदा १९५८ च्या कलम ४११ चा वापर करून जारी केला जात आहे. पाकिस्तानी ध्वज फडकवणाऱ्या कोणत्याही जहाजाला कोणत्याही भारतीय बंदरात प्रवेश दिला जाणार नाही. भारतीय ध्वज फडकवणारे कोणतेही जहाज पाकिस्तानातील कोणत्याही बंदरात जाणार नाही.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी वरिष्ठ संरक्षण अधिकाऱ्यांसोबत उच्चस्तरीय बैठक घेतली. या बैठकीत दहशतवादी हल्ल्याला प्रत्युत्तर देण्याबाबत सशस्त्र दलांना पूर्ण ऑपरेशनल स्वातंत्र्य देण्यात आल्याची माहिती सरकारी सूत्रांनी दिली. पंतप्रधान मोदी यांनी या बैठकीनंतर सांगितले की, दहशतवादाविरोधात निर्णायक कारवाई हा देशाचा ठाम संकल्प आहे.

प्रत्युत्तरादाखल, पाकिस्तानने भारतीय विमानांसाठी हवाई क्षेत्र बंद केले असून, भारतासोबतचा सर्व व्यापार, तृतीय देशांच्या माध्यमातून होणारा व्यवहारही

पान २ ▶

## निवडक

### जम्मू, गुजरातमध्ये भूकंपाचे धक्के

**जम्मू, दि. ३ :** जम्मू काश्मीर आणि गुजरातमध्ये भूकंपाचे धक्के जाणवले आहेत. या भूकंपाची तीव्रता कमी होती. त्यामुळे सुदैवाने कोणतीही जीवितहानी झालेली नाही.

गुजरातमध्ये शुक्रवारी रात्री ३.४ तीव्रतेचा भूकंप झाला. तर जम्मू काश्मीरमध्ये रात्री झालेल्या भूकंपाची तीव्रता २.७ इतकी नोंदवली गेली. लेह लडाखमध्येही भूकंपाचे धक्के जाणवले आहेत. या ठिकाणच्या भूकंपाची तीव्रता ३.९ इतकी नोंदवली गेली. गुजरात राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणानुसार, गुजरात भूकंपाच्या बाबतीत उच्च जोखीम असलेले क्षेत्र आहे. गेल्या २०० वर्षांत येथे नऊ मोठे भूकंप झाले आहेत.

### भारताचा पाकला आणखी एक दणका

**नवी दिल्ली, दि. ३ :** पहलगाम हल्ल्यानंतर भारत शत्रु राष्ट्र पाकिस्तानला एकामागून एक धक्के देत आहे. आता भारताने देशांतर्गत व्यापाराबाबत मोठे पाऊल उचलले आहे. भारताने पाकिस्तानकडून होणाऱ्या सर्व वस्तूंच्या प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष आयात- निर्यातीवर बंदी घातली आहे. म्हणजे भारताने दोन्ही देशातील व्यापार पूर्णपणे थांबवला आहे. पहलगाम हल्ल्यानंतर निर्माण झालेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर भारताने पाकिस्तानविरोधी कडक कारवाई सुरू केली आहे. या हल्ल्यानंतर भारताने सिंधू नदी करार रद्द केला, भारतातील पाकिस्तानी अधिकारी आणि नागरिकांना भारत सोडण्यास सांगितले. पाकिस्तानी मीडिया तसेच सोशल मीडिया चॅनेल्सवर बंदी घातली आहे. अटारी बॉर्डर बंद केली. भारताने पाकिस्तानविरोधात यांसारखे महत्त्वपूर्ण पावले उचलत, पाकिस्तानची कोंडी केली आहे. भारताने पाकिस्तानमधून प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष वस्तूंच्या आयातीवर बंदी घातली आहे, असे वाणिज्य मंत्रालयाने म्हटले आहे. पाकिस्तानमधून थेट आयात कमी झाली असली तरी, काही वस्तू अप्रत्यक्ष मार्गांनी किंवा तिसऱ्या देशांमधून देशात येत होत्या. त्यामुळे भारताच्या वाणिज्य मंत्रालयाने पाकिस्तानविरोधात कठोर निर्णय घेतला.

### आता व्हॉट्सअॅप वेबवरून कॉलिंग

**नवी दिल्ली, दि. ३ :** व्हॉट्सअॅपने आपल्या युजर्ससाठी एक नवीन फीचर आणले आहे. या नव्या फीचरमुळे युजर्संना आता थेट वेबवरून कॉलिंग करण्याची सुविधा मिळणार आहे. यापूर्वी व्हॉट्सअॅपने वेबवर केवळ चॅटिंग करण्याची सुविधा दिली होती, परंतु आता या नव्या फीचरमुळे युजर्स थेट कॉलिंग आणि व्हिडीओ कॉलिंग करू शकतील. यासाठी युजर्संना व्हॉटसअॅपच्या विंडोज किंवा मॅक अॅपची मदत घ्यावी लागेल, परंतु सर्व कॉलिंग फीचर्स व्हॉट्सअॅप वेबवरसुद्धा उपलब्ध असतील, अशी माहिती व्हॉट्सअॅपने दिली आहे. व्हॉट्सअॅपच्या वेब क्लायंटच्या लेटेस्ट बीटा व्हर्जनमध्ये या फीचरची टेस्टिंग सध्या केली जात आहे. येत्या काही आठवड्यांत सर्व युजर्ससाठी ही सुविधा उपलब्ध होण्याची शक्यता आहे. हे फीचर सर्वांसाठी उपयुक्त ठरणार आहे.

### अँथनी अल्बानीज ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान

**सिडनी, दि. ३ :** ऑस्ट्रेलियामध्ये अँथनी अल्बानीज यांनी ऐतिहासिक विजयाची नोंद केली आहे. सलग दुसऱ्यांदा पंतप्रधानपदी विराजमान होण्याचा मान त्यांना मिळाला आहे. देशाच्या राजकारणात २१ वर्षांमध्ये पहिल्यांदाच एखाद्या विद्यमान पंतप्रधानाला सलग पुन्हा सत्ता स्थापन करण्याची संधी मिळाली आहे. त्यांनी कंझर्व्हेटिव्ह पक्षाचे नेते पीटर डटन यांचा पराभव केला. दरम्यान, या विजयानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी अँथनी अल्बानीज यांचे अभिनंदन केले. पंतप्रधान मोदींनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स'वर वरील पोस्टमध्ये म्हटलं आहे की, हा ऐतिहासिक विजय दर्शवितो की ऑस्ट्रेलियातील लोकांना अजूनही तुमच्या नेतृत्व क्षमतेवर पूर्ण विश्वास आहे.


